जा.क्र. अमनपा/ससंनर/अभि/ ९५ /२०१७
दि. ०९/०८/२०१७

प्रति,

**श्री. देवेंद्र रामचंद्र चांडक,**
**रा. अमरावती.**

**विषय :** **मौजा नवसारी, ता.जि. अमरावती येथील शेत स.नं. १३१/१ पैकी मधील क्षेत्र १८ हे.आर. अभिन्यास नकाशास तात्पुरती तांत्रिकी मंजूरी देणे बाबत.**

**संदर्भ :** आपला दिनांक ०४/०५/२०१७ चा अर्ज.

आपल्या उपरोक्त संदर्भिय अर्जासोबत सादर केलेले कागद पत्रे तसेच प्रस्तावित अभिन्यास नकाशाच्या छाणणी अंती नियोजनाच्या माध्यमातून तांत्रिक दृष्टीने सर्वसाधारणपणे योग्य आढळून आल्याने खालील अटंवर तात्पुरती तांत्रिक मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

१) मंजूर अभिन्यासा प्रमाणे तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, यांचेकडून प्रत्यक्ष जागेवर आखणी करावी, आखणी करीत असतांना सभोवताल मंजूर अभिन्यासातील रस्त्याशी/नाल्याशी योग्यरित्या समन्वय साधणे आवश्यक राहील. आखणी नंतर काही फरक आढळल्यास जागेवरील आखणी केल्याप्रमाणे तालुका निरीक्षक, भूमी अभिले, अम. यांनी प्रमाणित केलेला मूळ मोजणी नकाशा व त्याआधारे तयार केलेले सिमांकित अभिन्यास नकाशे तयार करुन या कार्यालयाकडे ससादर करावे लागतील.

२) अभिन्यासाची जागेवर प्रत्यक्ष आखणी करतांना / केल्यानंतर सार्वजनिक उपयोगाकरिता राखून ठेवलेल्या खुल्या जागेचे क्षेत्रफळ अभियान्यासा खालील जागेच्या १०% पेक्षा कमी नसावे.

३) विषयांकित जागेत काही वृत्त असल्यास आखणीचे वेळी ती नष्ट न करता विद्यमान स्थितीत कायम ठेवावीत.

४) सिमांकित नकाशावर ड्रेनेजचे रेखांकन व छेद नकाशे दर्शविण्यात यावेत.

५) रस्त्याचा छेद नकाशात मंजूरी घेवूनच त्यानुसार खडीकरणाचे व सी.डी. वर्क इ. कामे पूर्ण करावे.

६) सिमांकित नकाशे १.५०० च्या प्रमाणात असावे.

७) भूखंडाची उपविभागणी महानगरपालिकेच्या पूर्व परवानगी शिवाय करता येणार नाही.

८) प्राथमिक विकासाची कामे खालील तीन पर्याय पैकी एका पर्यायानुसार करणे आवश्यक आहे.

अ) अभिन्यासातील भूखंडाचे निव्वळ क्षेत्रफळाचे १०% जमिन म.न.पा. कडे खरेदी करुन हस्तांतरीत करुन द्यावी लागेल.

ब) प्राथमिक विकासाकरिता येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रकास शहर अभियंता मनपा, अम. यांनी मंजूरी दिल्याप्रमाणे परीगणित होणारे एकूण शुल्क मनपा कडे अर्जदाराजी जमा करावी.

क) मा. आयुक्त यांच्या दि. २३/०४/०४ रोजीच्या आदेशानुसार, प्राथमिक विकासाची कामे स्वखर्चाने करावयाची असल्यास म.न.पा. कडून रस्ते, नाली इत्यादी बाबतीत म.न.पा.चे नियमानुसार क्रॉस सेक्शनसह रितसर मंजूरी घेवूनच करावी लागेल.

९) मा. आयुक्त यांच्या दि. १७.१२.२०१५ रोजीच्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

अ) रस्त्यालगत LED स्ट्रीट लाइट पाल ५०.०० मी. अंतरावर देण्यात यावे.

ब) अभिन्यासास अंतिम मंजूरात मिळाल्याशिवाय तथा अकृषक झाल्याशिवाय भूखंडांची विक्री करता येणार नाही

वरील बाबी चे नकाशे, साईझ (Size), इत्यादी व आवश्यक तेथे अंदाजपत्रक प्रथम मनपा कडुन मंजुर करण्यात यावे. व अभिन्यासाचे क्षेत्रफळानुसार प्रति हेक्टरी २५ प्रमाणे झाडे लावून ट्री गार्ड लावावे.

वरील सर्व प्राथमिक विकासाची कामे सक्षम अधिका-याकडुन तपासणी करुन त्यांचे समाधान झाल्यावर आपल्या सिमांकीत अभिन्यास नकाशाला अंतीम मंजूरी प्रदान करण्यात येईल. तसेच सदर कामे केल्याशिवाय कोणत्याही भुखंडावर बांधकाम परवानगी महानगर पालिके तर्फे देण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

( मा. आयुक्त, यांचे दि. ०३/०८/२०१७ चे आदेशान्वये)

**सहपत्र - मंजूर नकाशाची प्रत**

स्वा/-
**सहाय्यक संचालक नगर रचना**
**महानगरपालिका, अमरावती.**

**प्रतिलिपी -**

१. तालुका निरिक्षक, भुमि अभिलेख, अमरावती
२. शहर अभियंता, मनपा, अमरावती.
यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.

**सहाय्यक संचालक नगर रचना**
**महानगरपालिका, अमरावती.**